अर्वषणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी या योजनेतील सन २०१८-१९ मधील प्रलंबित रक्कम सन २०१९-२० मधील तरतुदीतुन अदा करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१९/(प्र.क्र.४९/१९)/मशि-३
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-१७ जून, २०१९

<u>वाचा :</u>- **१.** संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/१४ अई/ वि.वि.अनौ.संदर्भ/२७३९/२०१९-२०/६५१८, दि.०६.०५.२०१९.

<u>प्रस्तावना :</u>

अर्वषणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी या योजनेतील सन २०१८-१९ मधील प्रलंबित रक्कम सन २०१९-२० मध्ये मंजुर तरतुदीतुन अदा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

अर्वषणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी या योजनेतील सन २०१८-१९ मधील प्रलंबित असलेल्या रकमेपैकी रु.१६,६५,०००/- (रुपये सोळा लक्ष पासष्ट हजार फक्त) इतकी रक्कम सन २०१९-२० मधील मंजुर तरतुदीतुन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या बाबीवर येणारा खर्च "मागणी क्र. डब्ल्यु-०२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण ८०० इतर खर्च, (०४)(०१) अवर्षणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी/ प्रतिपुर्ती करणे (२२०२ २७३९) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. ३१९/२०१९/व्यय-५, दि.२२.०५.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीस अनुसरुन तसेच वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/ प्र.क्र.४४/ अर्थ-३, दि.०१.०४.२०१९ मधील अटी व शर्तीनुसार तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३ /विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ चे वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग-१, अनुक्रमांक ६ मधील नियम क्रमांक ४० अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयातील तसेच इतर संबंधीत शासन निर्णयांमधील तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्र. २०१९०६१७११५२५२५३०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Hemantkumar
Pandharinath
Baviskar

Digitally signed by Hemantkumar Pandharinath Baviskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=71de9bdf8c28541d92a5cd36d722315bab7f006ec5420633722d42e0976d82a8, serialNumber=284a4236ae7795d36dd2ecb5ac6ca70c333a3cf1b13f66828d224ae2026b37e9, cn=Hemantkumar Pandharinath Baviskar
Date: 2019.06.17 12:00:18 +05'30'

(हे. पं. बाविस्कर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
२. महालेखापाल लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
३. महालेखापाल लेखापरीक्षा, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
५. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई-३२.
६. कार्यासन (साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवडनस्ती, कार्यासन मशि-३.